# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

दुरध्वनी क्र. 0712–2567028
**Email ID : education.nmc@gmail.com**

सिव्हील कार्यालय,नागपूर
जा.क्र. शि.वि./1814/2014
दि 23/ 04/2014

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
म.न.पा. प्राथ/उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा. शाळा, नागपूर

**विषय :– उन्हाळयाचे सुट्टीत संगणक प्रयोगशाळा सुरु असण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, म.न.पा. द्वारे सुरु असलेल्या संगणक प्रकल्पांतर्गत असलेल्या सामायिक संगणकशाळा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी उन्हाळयाचे सुट्टीत सुरु असतील व याचा लाभ इच्छुक विद्यार्थी त्यांचे व्यक्तिमत्व विकासपर माहितीसाठी, मनोरंजनात्मक गेमसाठी तसेच शालेय विषयांचा व संगणकाचा सरावासाठी घेवू शकतील. तसेच इयत्ता 10 वी तील विद्यार्थ्यांची विशेष तयारी करवून घेण्याकरीता विषय शिक्षकांना उन्हाळयात सराव सत्र घेत असल्यास सराव सत्रासोबत विषयाची उजळणी संगणकावरील CAL सॉफ्टवेअर द्वारा करवून घेण्याकरिता संगणक प्रयोगशाळांचा उपयोग करता येईल. संगणक शिक्षक हे मु.अ. यांनी ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे नियमित संगणक प्रयोगशाळेत उपस्थित राहतील. तरी या सुविधेचा लाभ घेण्याकरिता याबाबत सूचना आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना द्याव्यात.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी :–

1) मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना माहितीस्तव सादर
2) मा. अपर आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना माहितीस्तव सादर
3) मा. उपायुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना माहितीस्तव सादर
4) सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी, झोन ................ क्र. ............ यांना माहितीस्तव सादर
5) एरीया मॅनेजर, 1)मे.सी.बी.एम ली. 2)मे. एव्हरॉन एज्युकेशन ली. यांना माहितीस्तव व संगणक प्रयोगशाळा सुरु व संगणक शिक्षक नियमित उपस्थित ठेवण्याबाबत अग्रेषित.